# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य,


## २८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१/२६३६०८५४

Email-trti.mah@nic.in Website- https:www.tribal.maharashtra.gov.in, www.trti.maharashtra.gov.in


# जाहिरात

आदिवासी विकास विभागातील योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे खालील पदासाठी विहित अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्यांना मानधन तत्वावर करार पध्दतीने नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी दिनांक 31/07/2017 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | कालावधी (महिने) | मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | Consultant (Statistics) | 1 | 9 | सा.प्र.वि., शा.नि. दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार |
| 2. | Research Associate | 2 | 9 | दरमहा रु.20,000/- |
| 3. | Research Assistant | 2. | 7 | दरमहा रु.16,000/- |

| | | |
|---|---|---|
| 1. | **पदाचे नाव-** | Consultant (Statistics)- 1 पद, **मानधन-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार सेवानिवृत्त अधिकारी यांस नियमाप्रमाणे देय असणारी रक्कम. 9 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची सांख्यिकी/ बायोमेट्रीक्स/ गणित/अर्थशास्त्र/इकॉनॉमेट्रिक्स/गणिती अर्थशास्त्र /वाणिज्य या विषयातील पदव्युत्तर पदवी. |
| | **कामाचा अनुभव-** | सांख्यिकी विषयक शासकीय कामाचा अनुभव तसेच आदिवासी विकास विभागात काम केले असल्यास प्राधान्य. |
| | **वयोमर्यादा-** | शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. कमाल वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त नसावी. |
| 2. | **पदाचे नांव-** | Research Associate- 2 पदे, **मानधन-** दरमहा रु.20,000/- प्रमाणे 9 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यता प्राप्त विद्यापिठाची सांख्यिकी/बायोमेट्रीक्स/गणित/अर्थशास्त्र/इकॉनॉमेट्रिक्स/ गणिती अर्थशास्त्र /वाणिज्य या विषयातील पदव्युत्तर पदवी. यामध्ये किमान द्वितीय श्रेणी आवश्यक. संगणक विषयक (Word, Excel, etc.) ज्ञान आवश्यक. संगणक हाताळणी /वापराबाबतचे MS-CIT अथवा GECT किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. मराठी व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक. |
| | **कामाचा अनुभव-** | सांख्यिकी व संगणक विषय कामाचा किमान 1 वर्षाचा अनुभव. शासकीय कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | **वयोमर्यादा-** | 18 ते 30 वर्ष. |
| 3. | **पदाचे नांव-** | Research Assistant- 2 पदे, **मानधन-** दरमहा रु.16,000/- प्रमाणे 7 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यता प्राप्त विद्यापिठाची सांख्यिकी/गणित/अर्थशास्त्र/वाणिज्य/इकॉनॉमेट्रिक्स या मधील पदवीधर. यामध्ये किमान द्वितीय श्रेणी आवश्यक. संगणक विषयक (Word, Excel, etc.) ज्ञान आवश्यक. संगणक हाताळणी/वापराबाबतचे MS-CIT अथवा GECT किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. मराठी व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक. |
| | **कामाचा अनुभव-** | सांख्यिकी कामाचा अनुभव/शासकीय कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | **वयोमर्यादा-** | 18 ते 30 वर्ष. |

त्याच प्रमाणे आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची गुणवत्तावाढ व मूल्यमापन, न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने विधीविषयक सल्ला व कामकाज व विविध योजनांचे प्रशिक्षण देण्यासाठी खालील पदासाठी विहित अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर नेमणूक करण्याकरिता पात्र उमेदवारांची नामिकासूची (Panel) तयार करावयाची आहे. त्यासाठी दिनांक 31/07/2017 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पद संख्या** | **कालावधी (महिने)** | **मानधन** |
|---|---|---|---|---|
| 1. | सहआयुक्त | 1 | 11 | सा.प्र.वि., शा.नि. दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार |
| 2. | मानवंशशास्त्रज्ञ | 1 | 11 | |
| 3. | संशोधन अधिकारी | 1 | 11 | |
| 4. | विधी सल्लागार | 1 | 11 | |
| 5. | विधी अधिकारी | 2 | 11 | |

| | | |
|---|---|---|
| 1. | **पदाचे नाव-** | **सहआयुक्त** - 1 पद, **मानधन-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 17 डिसेंबर, 2016 नुसार सेवानिवृत्त अधिकारी यांस नियमाप्रमाणे देय असणारी रक्कम. 11 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची समाजशास्त्र/ समाजकार्य/ मानववंशशास्त्र या विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी. |
| | **कामाचा अनुभव-** | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीमधील सहआयुक्त या पदावर काम केल्याचा कमीत कमी 3 वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | **वयोमर्यादा-** | शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. कमाल वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त नसावी. |
| 2. | **पदाचे नाव-** | **मानवशास्त्रज्ञ** - 1 पद, **मानधन-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार सेवानिवृत्त अधिकारी यांस नियमाप्रमाणे देय असणारी रक्कम. 11 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची मानवशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी (कमीत कमी उच्च द्वितीय श्रेणी) व पी.एच.डी. धारक |
| | **कामाचा अनुभव-** | मानववंशास्त्र या विषयामध्ये पदवीत्तर पदवी तसेच या विषयाचा कामकाजाचा 3 वर्षाचा अनुभव. |
| | **वयोमर्यादा-** | शासकीय/निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. कमाल वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त नसावी. |
| 3. | **पदाचे नाव-** | **संशोधन अधिकारी** - 1 पद, **मानधन-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार सेवानिवृत्त अधिकारी यांस नियमाप्रमाणे देय असणारी रक्कम. 11 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची समाजशास्त्र/ समाजकार्य या विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी. |
| | **कामाचा अनुभव-** | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीमधील तसेच समाजकल्याण विभागाकडील समित्यामध्ये संशोधन अधिकारी या पदावर काम केल्याचा कमीत कमी 5 वर्षाचा अनुभव आवश्यक |
| | **वयोमर्यादा-** | शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. कमाल वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त नसावी. |
| 4. | **पदाचे नाव-** | **विधी सल्लागार**- 1 पद, **मानधन-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार सेवानिवृत्त अधिकारी यांस नियमाप्रमाणे देय असणारी रक्कम. 11 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची विधी या विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी. |
| | **कामाचा अनुभव-** | निवृत्त जिल्हा सत्र न्यायाधीश म्हणून कामकाज पाहिलेले व न्यायालयामध्ये कमीत कमी 5 वर्ष कामकाजाचा अनुभव असलेले अधिकारी.अनुसूचित जमातीचे प्रकरणे हाताळणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |
| | **वयोमर्यादा-** | शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. कमाल वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त नसावी. |

| | | |
|---|---|---|
| 5. | **पदाचे नाव-** | **विधी अधिकारी-** 2 पदे, **मानधन-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार सेवानिवृत्त अधिकारी यांस नियमाप्रमाणे देय असणारी रक्कम. 11 महिन्यासाठी. |
| | **शैक्षणिक अर्हता-** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची विधी या विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी. |
| | **कामाचा अनुभव-** | जिल्हा सत्र न्यायालय/ मा. उच्चन्यायालयात कामकाज केल्याचा कमीतकमी 5 वर्षाचा अनुभव |
| | **वयोमर्यादा-** | शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी. कमाल वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त नसावी. |

(1) **अर्ज करण्याची पध्दत** : इच्छुक व अर्हताप्राप्त अधिकाऱ्यांनी A-4 आकाराच्या कागदावर टंकलिखित करुन परिपूर्ण अर्ज टपालाद्वारे **'आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, 28,क्वीन्स गार्डन, पुणे-411 001'** या पत्त्यावर दिनांक 31/07/2017 रोजी संध्याकाळी 5.30 वाजेपर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जावर अलिकडील पासपोर्ट आकाराचा आकाराचा फोटो स्वत: साक्षांकित करुन चिकटविणे आवश्यक आहे. अर्जाचा लिफाफयावर ठळक अक्षरात **'करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्तीबाबत'** अर्ज असे नमूद करावे.

**अर्जात खालील बाबींचा समावेश असावा : (आवश्यक कागदपत्रे जोडणे)**

| | |
|---|---|
| 1. | शासन सेवेतील नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतच्या कालावधीत विविध विभागात केलेल्या सेवेचा तपशील |
| 2. | सेवानिवृत्तीचे आदेश |
| 3. | वयाचा पुरावा |
| 4. | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| 5. | सेवानिवृत्तीच्या दिनांकावेळचे वेतन |
| 6. | विभागीय चौकशीबाबतचे प्रमाणपत्र |
| 7. | Conflict of Interest जाहिर करण्याबाबत |

(2) **अटी व शर्ती** :-

| | |
|---|---|
| 1. | अधिकाऱ्यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 17 डिसेंबर, 2016 मधील परिच्छेद 1 मध्ये नमूद केल्यानुसार विषयनिहाय विवक्षित कामासाठीच असेल. |
| 2. | विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान अनुभव उपरोक्त पदासमोर नमूद वर्षाचा आवश्यक |
| 3. | सदर नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त 11 महिण्यासाठी असेल. या नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही. |
| 4. | अधिकाऱ्याने Conflict of Interest जाहिर करणे आवश्यक आहे. |
| 5. | सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. अशा परिश्रमिकाची कमाल मर्यादा मासिक रु.58,500/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत असेल. |
| 6. | करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे या नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क राहणार नाही. |
| 7. | करार पध्दतीने नियुक्ती अधिकारी, शारिरीक, मानसिक या आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच प्रस्तावित सेवेसाठी आवश्यक क्षमता असावी. |
| 8. | नियुक्ती कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबधित अधिकाऱ्याची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र शासनास सादर करावे. सदर बंधपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याबाबतचा बंधपत्रात समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| | 9. | अधिकाऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी |
| | 10. | नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार असतील. |
| | 11. | नियुक्ती झालेला अधिकारी त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा. |
| | 12. | नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळी वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. |
| | 13. | करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता बाळगणे आवश्यक आहे. |
| | 14. | नियुक्त झालेल्या अधिकाऱ्याने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. |
| | 15. | मुलाखतीस अर्जदारास स्वखर्चाने यावे लागेल. निवड प्रक्रियेत बदल करण्याचे अथवा ती रद्द करण्याचे व इतर सर्व अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात येत आहेत. |

| | |
|---|---|
| **दिनांक** :- 21/07/2017<br>**टिकाण** :- **पुणे** | **(नरेंद्र पोयाम)**<br>**आयुक्त,**<br>**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**<br>**महाराष्ट्र राज्य, पुणे** -1 |

## अर्जाचा नमुना

प्रति,

मा. आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१

विषय :- मूल्यमापन व गुणवत्तावाढ, न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने विधीविषयक सल्ला व कामकाज व विविध योजनांचे प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक मनुष्यबळाची मानधन तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत.

महोदय,

दिनांक २१/०७/२०१७ रोजी प्रसिध्द झालेले जाहिरातीतील ---------------------------या पदासाठी अर्ज करित आहे. माझी वैयक्तिक माहिती खालिलप्रमाणे :-

१. अर्जदाराचे नाव :- ---------------------------------------------------------------------------
२. वडिलांचे नाव/ पतीचे नाव :- -----------------------------------------------------------------
३. लिंग :- ------------------ ४. जात :- -------------------------------------
५. जन्म तारीख :- --------------------------
६. पूर्ण वय वर्षे (दिनांक ३०/०६/२०१७ रोजी) ------ वर्षे ------- महिने
७. सध्याचा संपूर्ण पत्ता :- ---------------------------------------------------------------------
८. कायम राहण्याचा पत्ता :- -------------------------------------------------------------------
८. दुरध्वनी क्रमांक :- -------------------- १०. भ्रमणध्वनी क्रमांक :- ----------------------
११. ई-मेल आयडी :- ------------------------
१२. शौक्षणिक पात्रता :- ---------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------
१३. शासकिय सेवेत रुजू दिनांक :- -------------------------------------------------------------
१४. शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक :- ------------------------------------------
१५. सेवानिवृत्तीच्या दिनांकावेळचे वेतन :- ------------------------------------------------------
१६. अनुभव :- ----------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------

अर्जासोबत माझ्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने शौक्षणिक पात्रता, जन्म तारीख, सेवा विषयक कागदपत्रे, अनुभव आणि शासन सेवेतील नियुक्तीपासून सेवानिवृती पर्यंतच्या कालावधीत विविध विभागात केलेल्या सेवेचा तपशिलाच्या मूळ प्रतीनुसार प्रमाणित केलेल्या छायामुद्रांकित प्रती या सोबत जोडलेल्या आहेत. माझी सर्व माहिती हि सत्य व अचूक आहे. तरी माझी -------------------------या पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

आपला/आपली विश्वासू

दिनांक :- --/०७/२०१७
टिकाण :- अर्जदाराची सही